# हेलिकॉप्टर डिप्लोमासी...!








# ना.अजित पवारांनी स्वत:च्या पायावर धोंडा मारून घेतला!

## मुख्यमंत्र्यांनी डीएमला खुणावलं,हेलिकॉप्टरमध्ये बसवलं अन् डाव साधला

## पश्चिम महाराष्ट्र,मराठवाडा,विदर्भासह मुंबईतील आ.धनंजय मुंडेंना मानणारा मतदार भाजपकडे गेला

# अन् दादा,तुमचा महानगरपालिकेच्या निवडणुकीत टांगा पलटी केला

बीड (सरकार): गहिनीनाथगडा वरील पुण्यतिथी सोहळा निमित्ताने चाणक्य, धुरंधर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पावनभूमीतून आशीर्वाद देतले आणि हेलिकॉप्टरमध्ये बसण्याच्या वेळेला आ.धनंजय मुंडेंना खुणावलं आणि हेलिकॉप्टरमधून घेऊन गेले. हेलिकॉप्टरमध्ये जे घडलं , जे ठरलं ते महानगरपालिकेच्या निवडणुकीत दिसून आलं. हेलिकॉप्टर डिप्लोमासी झाली. या हवाई प्रवासात मराठवाडा,पश्चिम महाराष्ट्र, विदर्भासह मुंबईतील आ.धनंजय मुंडेंना मानणारा मतदारांनी हे डोळ्यांनी पाहीलं, एकंदरीत अजित पवारांनी किंवा त्यांच्या राजकारणाच्या कुरघोडीमुळे मंत्रीपदापासून धनंजय मुंडेंना रोखून धरले. मात्र यामध्ये राजकारणातील धुरंधर चाणक्य देवेंद्र फडणवीस यांनी डाव साधला आणि धनंजय मुंडेना मानणारा बहुसंख्य ओबीसी भाजपाच्या मतदार रूपातून महानगरपालिकेच्या निवडणुकीत विजयामध्ये दिसून आला आहे. मात्र दुसरीकडे अजित पवारांनी खोटा शिक्का नेहून आणि धनंजय मुंडेंना या निवडणुकीत दूर ठेवून स्वत:च्या पायावर मोठा धोंडा मारून घेतल्याची चर्चा राजकीय तज्ञांकडून वर्तविली जात आहे.

मागच्या आठवड्यात दहा तारखेला संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाकरीता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले. मात्र त्या अगोदर मुक्कामी असलेले माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते सालाबादाप्रमाणे महापुजा करण्यात आली. या पवित्र भूमितून आशीर्वाद घेऊन चाललेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यामध्ये खुणावा खुणवी झाली. आणि पुढे हेलिकॉप्टर डिप्लोमासी झाली. हेलिकॉप्टरमध्ये मुख्यमंत्री आणि आ.धनंजय मुंडे यांना सोलापूरच्या दिशेने घेऊन गेले. नेमकी काय चर्चा केली असेल. चर्चा मुख्यमंत्र्यांनी करण्याची गरजच उरली नाही. आ.धनंजय मुंडे यांच्या मानणाऱ्या मतदारांनी चर्चा केली आणि आ.धनंजय मुंडे आता भाजपाच्या वाटेवर असल्याचे पाहून त्यांना मानणारा मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, मुंबईसह कल्याण, ठाणे, विदर्भ भला मोठा असलेला ओबीसी समाज धडा धडा महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाला मतदान दिले. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून आ.धनंजय मुंडेंना मंत्रीपदापासून रोखण्याचे काम केले जात आहे. एवढेच नव्हे तर बीड जिल्ह्यातही विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून डावलण्याचे षढयंत्र बीड जिह्यासह ओबीसी व इतर मानणाऱ्या वर्ग उघड्या डोळ्यांनी बघत आहे आणि एवढेच नव्हे तर अजितदादा पवारांनी एका खोट्या शिक्क्याला सोबत नेऊन काहीच साध्य झाले नाही. मात्र चालणारा शिक्का या शिक्क्याला मानणारा वर्ग आणि हा खरा शिक्का कसा चालतो, कसा पळतो हे महानगरपालिकेच्या निवडणुकीत दिसून आले आहे. मात्र हेलिकॉप्टर डिप्लोमासी मुख्यमंत्र्यांनी साधून घेतली आणि महानगरपालिकेच्या निवडणुकीत भलामोठा असलेला ओबीसी समाज मतदानापूर्वीच आपलेसे करण्याचा डाव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साधला. आणि महानगरपालिकेच्या निवडणुकीत अजित पवारांनी माजी मंत्री आ.धनंजय मुंडेंना जाणून बुजून दूर ठेवले त्यामुळेच त्यांचा या निवडणुकीत टांगा पलटी झाला आहे. त्यामुळे दादा आ.धनंजय मुंडे खरा शिक्का आहे. हे राजकारणातील धुरंधर चाणक्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कळले मात्र तुम्हाला नाही कळाले. त्यामुळे तुमच्या हातातून पश्चिम महाराष्ट्र गेला. पुणेही गेलं आणि पिंपरी चिंचवडसह मराठवाडा आणि मुंबईही गेली. आता येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत बीड जिल्ह्यात परिवर्तनाची लाट येणार. जिल्हा परिषद, पंचायत समिती यामध्ये आ.धनंजय मुंडे यांचा धुरंधरपणा दिसून येणार. एवढेच नव्हे तर पुढचे भाकीत असेही आहे. बीड नगर पालिकेतील सत्तेचा टांगाही पलटी होणार असल्याचे बोलले जात आहे.


beedsarkar

संपादक-आदोडे साहस

E-mail : beedsarkar @ Gmail.com

E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# बीडसरकार

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १३ वे ■ अंक ७२ ■ शनिवार १७ जानेवारी २०२६ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल दि.१८ जानेवारी २०२६ ■ पाने ४ ■ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 13 ■ Issu 72 ■ Saturday 17 January 2026 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


# मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्याचं ठरलं, मुंबईचा महापौर अडीच-अडीच वर्षाचा फॉर्म्युला?



## शिंदेंची सेना थेट ५ स्टार हॉटेलमध्ये

मुंबई (सरकार) मुंबईत अडीच-अडीच वर्षे महापौर पद विभागून द्यावे, अशी मागणी आता शिंदे सेनेच्या नगरसेवकांनी आणि नेत्यांनी केली आहे. २३ जानेवारीपासून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत असून, या विशेष वर्षात शिवसेनेचा महापौर असावा, अशी इच्छा या नेत्यांनी व्यक्त केली आहे.

शिवसेनेचे सरचिटणीस राहुल शेवाळे यांनी यापूर्वी एका मुलाखतीत नमूद केल्यानुसार, प्रत्येक वेळी भाजपच्या मदतीनेच शिवसेनेचा महापौर पदावर बसला आहे; त्यामुळे या वेळीही तशीच अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या मागणीच्या पार्श्वभूमीवर, शिंदे सेनेच्या सर्व नगरसेवकांना वांद्रे येथील ताज लँड्स एंड हॉटेलमध्ये नेण्यात येत आहे. ते पुढील दोन ते तीन दिवस तिथेच मुक्कामी असतील.



मुंबईचा महापौर भाजपचा होणार की एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ही संधी मिळणार, हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात दिल्लीच्या माध्यमातून होणाऱ्या चर्चेवर अवलंबून असेल. या राजकीय घडामोडींमुळे मुंबईच्या महापौर पदाबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

मुंबई महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाने दणदणीत ८९ जागा जिंकल्या. या चुरशीच्या निवडणुकीत भाजप-शिवसेना-रिपाइं महायुतीने २२७ सदस्यीय महानगरपालिकेत ११८ जागांसह स्पष्ट बहुमत मिळवले. गेल्या २०१७ च्या निवडणुकीत भाजपला ८२ जागा मिळाल्या होत्या. या लढाईत शिंदे सेनेची मात्र पिछेहाट झाली. जेमतेम २९ जागांवर शिंदे सेनेला समाधान मानावे लागले. याउलट भाजपने मात्र आजवरच्या सर्वाधिक ८९ जागा जिंकल्या. फंदफितुरी होऊनही ठाकरेंनी ६५ जागा खेचून आणल्या. राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला ५२ जागा लढूनही फक्त ६ जागा जिंकता आल्या. २४ जागांवर घसरलेल्या कॉंग्रेसला स्थानिक नेत्यांनीच केलेला दगाफटका भोवला.



## माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांना अंबाजोगाई जिल्हा सत्र न्यायालयाकडून दिलासा

# मुंजा गित्ते जमीन खरेदी खटला पुनरुज्जीवित करण्यास स्थगिती

अंबाजोगाई (सरकार): जगमित्र शुगर्स या प्रस्तावित कारखान्यासाठी जमीन खरेदी प्रकरणात माजी मंत्री आ धनंजय मुंडे यांच्या सह तिघांविरुद्ध फसवणूक केल्याच्या खटल्यात अंबाजोगाई न्यायालयाने धनंजय मुंडे व अन्य तिघांना दोषमुक्त केले होते. त्यावर अंबाजोगाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात हा खटला पुन्हा सुरू करण्याचा अर्ज केल्यानंतर न्यायालयाने तो खटला पुनरुज्जीवित करण्याच्या दिलेल्या निर्णयावर धनंजय मुंडे यांनी केलेल्या अर्जावर सुनावणी घेतल्यानंतर स्थगिती दिली आहे.



न्यायालयात धनंजय मुंडे यांच्या वतीने त्यांचे वकील ॲड. अशोक कवडे यांनी स्थगिती अर्ज दाखल केला होता. धनंजय मुंडे यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अपील दाखल करे पर्यंत किंवा अपिलाची मुदत पूर्ण होई पर्यंत हा खटला चालविण्यास अंबाजोगाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने ही स्थगिती दिली आहे.

२०११ -१२ साली खरेदी केलेल्या या जमिनीच्या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्या विरोधात बर्दापूर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली, तत्कालीन परिस्थितीत पोलिसांनी तपास करून तक्रारीत तथ्य न आढळल्याने गुन्हा दाखल केला नाही, त्यानंतर उच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल करून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. या खटल्यात दोन्ही पक्षांचे म्हणणे, साक्ष, पुरावे इत्यादी वस्तुस्थिती पाहून अंबाजोगाई न्यायालयाने धनंजय मुंडे व अन्य तिघांना दोषमुक्त केले होते. मात्र त्याविरुद्ध जिल्हा सत्र न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्यावर धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी केलेल्या अर्जावर दोन्ही बाजूंचे म्हणणे न्यायालयाने ऐकल्यानंतर स्थगिती देण्यात आली असून, श्री मुंडे यांना अपील करण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आला आहे.

न्यायालयाचा स्थगिती निकाल स्वयंस्पष्ट असून तो न्यायालयाच्या पोर्टलवर देखील उपलब्ध आहे. मात्र याबाबत अर्धवट माहितीच्या आधारे कुणीतरी खोडसाळपणाने चुकीचे वृत्त प्रसिद्ध केले असून, संबंधितास कायदेशीर नोटीस पाठवणार असल्याचे मुंडे यांचे वकील ॲड. अशोक कवडे यांनी सांगितले आहे.

## राज्यातील २९ महापालिकांचा निकाल लागताच मंत्रिमंडळाच्या बैठकीत १० मोठे निर्णय

मुंबई (सरकार): मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (१७ जानेवारी) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत १० महत्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूच्या पथकरात आणखी एक वर्षभर सवलत देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या १ हजार ९०१ पदांच्या आकृतीबंधास व संचालनालयाचे नाव अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय करण्यास मान्यता. जिल्हा नियोजन समित्या, सहआयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, मानव विकास कार्यक्रम, वैधानिक विकास मंडळ, तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम, नक्षलवाद विशेष कृति आराखडा कक्ष यांच्या कार्यालयांसाठी आवश्यक, अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतीबंध. (नियोजन विभाग) अटल बिहारी वाजपेयी शिवडी- न्हावाशेवा अटल सेतूच्या पथकरात आणखी एक वर्षभर सवलत देण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय. वाहनधारकांना दिलासा (नगर विकास विभाग) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा ह्न २ (एमयुटीपी -२) साठी सुधारित खर्चास व शासन हिस्सा उचलण्यास मंजुरी. (नगर विकास विभाग) तिरूपती देवस्थानास पद्मावती देवी मंदिरासाठी दिलेल्या उलवे येथील भुखंडासाठीचे शुल्क माफ (नगर विकास विभाग) पीएम ह्न ई ड्राईव्ह योजनेंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या एक हजार ई- बस सुविधेसाठी निधी वळता करण्याच्या थेट प्रणालीस मान्यता. पेमेंट सिक्युरिटी मेकॅनिझम अंतर्गत पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या खात्यातून डायरेक्ट डेबीट मॅन्डेंट (डीडीएम) द्वारे संबंधित कंपन्यांना खर्चाची रक्कम मिळणार ( नगर विकास विभाग) भाजीपाला निर्यातीकरिता शेतकऱ्यांसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगांव (ता. भिंवडी ) येथे सर्वोपयोगी ह्न मल्टी मॉडेल हब व टर्मिनल मार्केटची उभारणी. त्यासाठी राज्य कृषि पणन महामंडळाला ७ हेक्टर ९६.८० आर जमीन उपलब्ध करून देणार. व्हेपर हिट ट्रीटमेंट, प्लँट विकीरण, पॅक हाऊस सुविधा तसेच फळे- भाजीपाला साठवणुकीकरिता सुविधांची उभारणी (महसूल विभाग) यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४ हजार ७७५ कोटींची मान्यता. प्रकल्पामुळे पाच तालुकयातील ५२ हजार ४२३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार. अमरावती जिल्ह्यातील मौजा धामकच्या पुनवर्सनाचा प्रश्न मार्गी (जलसंपदा विभाग)

मुंबईतील पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थाने उपलब्ध होणार. मुंबई पोलिस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पास मंजुरी. मुंबई शहर व उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ४५ हजार शासकीय निवासस्थाने बांधली जाणार. ( गृह विभाग) राज्यातील युवकांना परदेशातील रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशिलता आणि क्षमता संस्था (महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलीटी अँण्ड अँडव्हान्समेंटस् ह्न महिमा) स्थापन करण्यास मंजुरी. प्रशिक्षित, कुशल युवकांना जगभरातील रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी समन्वय व अमंलबजावणीसाठी संस्था काम करणार. (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळास पनवेल (पश्चिम) येथील भूखंड देण्यास मान्यता. महामंडळाला मुख्यालयाची व बहुउद्देशीय इमारत उभी करता येणार. ( नगर विकास विभाग)

## संपादकीय

# आता विकासाचे बोला...

महानगरपालिका निवडणुकांचा गदारोळ संपला, निकाल लागले आणि विजयी उमेदवारांच्या गळ्यात हार पडले. पण आता मतदारांचा सवाल बदलला आहे. प्रचारात 'विकास' हा शब्द वारंवार ऐकू आला; मात्र प्रत्यक्षात तो कधी आणि कसा दिसणार, हा प्रश्न सामान्य नागरिक विचारू लागला आहे. विजयाचा जल्लोष क्षणिक असतो, पण जबाबदारी मात्र पाच वर्षांची असते. म्हणूनच आजपासूनच नव्हे, तर आत्ताच नवनिर्वाचित नगरसेवकांनी विकासाच्या दिशेने ठोस पावले उचलण्याची गरज आहे, कारण आता ते पक्षाचे नाही, तर प्रभागातील प्रत्येक नागरिकाचे प्रतिनिधी आहेत.

महाराष्ट्र राज्यातील २९ महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत विकासाला मत द्या म्हणून मतदार राजाला साद घालणारे उमेदवार निवडून आल्याने 'आता विकासावर बोला' असे प्रभागातील सुजाण नागरिक म्हणू लागले आहेत. तेव्हा काल जरी विजयाचा गुलाल उधळला तरी उद्या म्हणण्यापेक्षा आजपासून विकासकामांना नवनिर्वाचित नगरसेवकांना सुरुवात करावी लागेल. कारण आता ते एका पक्षाचे नसून प्रभागाचे नगरसेवक आहेत याची जाणीव असायला हवी. जवळजवळ नऊ वर्षांनंतर निवडणुका होत आहेत हे सुद्धा लक्षात ठेवायला हवे.


राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांच्या १५ डिसेंबर, २०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम सन २०२५-२६ जाहीर झाला. त्यानंतर सर्वप्रक्रिया होऊन निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली. यात राज्यातील २७ महानगरपालिकांची मुदत संपली होती, तर जालना व इचलकरंजी येथील दोन महानगरपालिका नवनिर्मित होत्या. राज्यातील एकूण २९ महापालिकांच्या १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होऊन १६ जानेवारीला निकाल सुद्धा लागला. म्हणजे गुलाल कोण उधळणार याचे उत्तर सुद्धा मतदार राजाला काल मिळाले. तेव्हा मतदान झाले, निकाल लागला, 'आता विकासाचे बोला' असे मतदार राजा व नागरिक नवनिर्वाचित नगरसेवकांना म्हणत आहेत. त्यामुळे राजकीय पक्ष आणि त्या पक्षातून निवडून आलेले नगरसेवक यांनी आपल्या जाहीरनाम्यात दिलेल्या वचनांची पूर्तता करण्यासाठी विकासकामांना गती दिली पाहिजे. ते सुद्धा नि:पक्षपातीपणे सार्वजनिक काम करायला हवे. जरी मी पक्षाचा सभासद असलो तरी लोकप्रतिनिधी आहे. लोकांनी मला निवडून दिले आहे.

तेव्हा लोकांच्या कल्याणासाठी मी काम करेन ते सुद्धा भारतीय संविधानानुसार, देशातील लोकशाहीचा पाया भक्कम करण्यासाठी. तरच आपल्या नगरसेवक पदाच्या कार्यकाळात निवडून आलेल्या प्रभागाचा सर्वांगीण विकास होण्याला मदत होईल. निवडून आलेल्या नगरसेवकांमधून 'महापौर' निवडला जातो. महापौर प्रमुख असतात, तर प्रशासकीय अधिकारी म्हणून महापालिका आयुक्त काम पाहतात. ज्या शहराची लोकसंख्या दहा लाखांपेक्षा जास्त असते अशा शहरी क्षेत्राचे व्यवस्थापन महापालिकेमार्फत करण्यात येते. शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन त्यांना विकासात्मक विविध सेवा पुरविण्याचे काम महापालिका करीत असते. शहराचे विकासाच्या दृष्टिकोनातून विकास आराखडा तयार करणे, शहरातील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी देणे, रस्ते वाहतूक व्यवस्थित करणे, योग्य ठिकाणी नाला किंवा नद्यांवर पूल बांधणे, रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी गटारे बांधणे, वीजपुरवठा पुरविणे, शहरातील प्रत्येक विभागामध्ये मोफत आरोग्य सेवा देणे, वाहतूक सेवा, घनकचरा विभागामार्फत कचऱ्याची विल्हेवाट लावणे, सुखा कचरा आणि ओला कचरा स्वतंत्र डब्यात गोळा करणे, मुलांना मोफत प्राथमिक शिक्षण देऊन महानगरपालिकेमार्फत शाळा चालविणे. यासाठी विविध नागरी सेवेतून उत्पन्न मिळविले जाते. यात मालमत्ता उत्पन्न कर नागरिकांकडून गोळा करणे, पाणीपट्टी, दंड वसुली आणि राज्य सरकारचे अनुदान इत्यादी मार्गाने उत्पन्न मिळवून ही स्वायत्त संस्था आपली विविध कामे करीत असते. आता निवडून आलेल्या नगरसेवकांना वचनपूर्ती करावी लागेल. राज्यात २९ शहरांमध्ये महानगरपालिका असल्या तरी त्याची फारशी स्वच्छता दिसत नाही. जरी असली तरी स्वच्छतागृह फारच अस्वच्छ असतात. त्याकडे लक्ष देणे गरजचे आहे. कोविडमध्ये त्याचा सर्वांना अनुभव आला असेल. तेव्हा सुंदर शहरासाठी स्वच्छता अतिशय महत्त्वाची असते. तेव्हा घनकचरा व्यवस्थापकांनी कामामध्ये सतर्क राहावे लागेल. त्यावर करडी नजर नगरसेवकांना ठेवावी लागणार आहे.

आपली मातृभाषा मराठी आहे. महापालिकेच्या शाळा बंद पडत चालल्या आहेत. काही ठिकाणी शाळेत मुलेच नाहीत अशी परिस्थिती दिसते. ही मराठीच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे. तेव्हा मराठी शाळेची घंटा रोज वाजली पाहिजे. तरच मराठी भाषेला मानाचे पान मिळेल. सध्या राज्यात रोजगारीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्या आनुषंगाने रिकाम्या हातांना रोजगार मिळाला पाहिजे. तो सुद्धा कायमस्वरूपात असावा. अजूनही अनेक शहरात स्वच्छ आणि पुरेसे पाणी नागरिकांना मिळत नाही. तेव्हा स्वच्छ पाणी नागरिकांना कसे मिळेल या दृष्टिकोनातून प्रयत्न करावा. अनेक ठिकाणी रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू असून पूर्ण झालेले नाही. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. शहरातील सार्वजनिक बससेवा सुरळीत चालली पाहिजे ती सुद्धा फायद्यात. कारण ती त्या शहराची जीवनवाहिनी असते. त्यात डबलडेकरच्या बससेवा आणि आताच्या आधुनिक बससेवा तोट्यात चालत आहेत. त्यावर योग्य ती उपाययोजना होणे गरजेचे आहे. तसेच वाढत्या विजेच्या दराकडे सुद्धा लक्ष द्यायला हवे. यात सर्वसाधारण नागरिकांना जास्त भाडेवाडीची झळ पोहोचते. निवडणूक काळात लाडक्या बहिणींना आचारसंहितेमुळे अग्रिम लाभापासून वंचित राहावे लागले होते त्यांचे सुद्धा सक्षमीकरण आता झाले पाहिजे. शहरातील पादचाऱ्यांसाठी असणाऱ्या फुटपाथवर अतिक्रमण झालेले आहे ती जागा मोकळी करणे. त्यात फेरीवाले, दुकानानजीक अवैद्य धंदे, बांधकाम व गाड्या उभ्या करणे यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होत असते. यातून मोकळा श्वास घेण्यासाठी नगरसेवकांनी पुढाकार घ्यावा. महत्त्वाची बाब म्हणजे, महानगरपालिकेच्या शाळांमध्ये जे अतिक्रमण झालेले आहे त्यावर सुद्धा निर्बंध घालावे लागतील.

शहरात मध्यभागी क्रीडा संकुल ज्या ठिकाणी नाहीत त्या ठिकाणी बांधण्यात याव्यात. तेव्हा राज्यातील २९ महानगरपालिकेतील नवनिर्वाचित नगरसेवकांना मतदार राजाने उमेदवाराच्या नावाच्या समोर असणाऱ्या चिन्हाच्या समोरील बटण दाबून विजयी करून दिले आहे. त्यामुळे आपल्या प्रभागातील मतदार राज्याला नगरसेवकांना 'आता विकासाचे बोला' अशी वेळ बोलण्याची येण्यापूर्वी नागरिकांच्या विकासासाठी विकासकामे हाती घ्यावी लागतील.

# भविष्यवेध!



'सीपीयू'ऐवजी 'जीपीयू', 'टीपीयू' चिप येताहेत; मग तंत्रज्ञान आहे तसंच राहील? निर्मितीतल्या मक्तेदारीचं काय होईल आणि चिपपायी युद्धं होतील?

मानवाच्या केवळ एका बोटावर मावू शकेल एवढ्या आकाराच्या पण समग्र डिजिटल विश्वाचा डोलारा जिच्या भक्कम पायांवर समर्थपणे उभा राहिला आहे अशा सेमीकंडक्टर चिपनं मानवजातीच्या सर्वांगीण प्रगतीत अत्यंत मोलाची भूमिका निभावली आहे हे नि:संशय! अशा कळीच्या तंत्रज्ञानाचा आणि त्यावर आधारित सेमीकंडक्टर चिपनिर्मिती उद्योगक्षेत्राचा जर भविष्यवेध घेण्याचा प्रयत्न केला तर काही बाबी ठळकपणे लक्षात येतात.

(१) आज जरी चिप तंत्रज्ञानाचं डिजिटल युगातलं स्थान एकमेवाद्वितीय असलं तरीही येत्या काळात ते तसंच राहील याची खात्री देता येणार नाही. गणनक्षमतेची (प्रोसेसिंग पॉवर) वाढती मानवी भूक हे तंत्रज्ञान किती काळापर्यंत पुरवू शकेल, वेगाने वाढणाऱ्या मागणीच्या तोडीस तोड गतीनं कितपत पुरवठा करू शकेल यावर या तंत्रज्ञानाचं भवितव्य ठरेल. जेमतेम एक ते दोन चौरस सेंटीमीटर क्षेत्रफळ असलेल्या सेमीकंडक्टर चिपमध्ये किती ट्रान्झिस्टर कोंबणार याला काही भौतिक मर्यादा आहेत. चिप तंत्रज्ञानाच्या प्रगतीची दिशा दर्शवणारा 'मूरचा नियम' हा शेवटी एक अनुभवजन्य सिद्धान्त आहे, तो काही भौतिकशास्त्राचा नियम नाही आणि या क्षेत्रात मूरच्या नियमाबरहुकूम यापुढे गोष्टी चालणार नाहीत यावर जगभरातील तज्ज्ञांचं एकमत व्हायला लागलं आहे. पण यामुळे निराश व्हायची गरज नाही. मूरच्या नियमाचं दफन करण्याचा प्रयत्न याआधीही अनेकदा झालाय पण दरवेळी भौतिक किंवा रसायनशास्त्रातल्या नव्या शोधांमुळे त्याचं पुनरुज्जीवनही झालंय. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात जेव्हा दस्तुरखुद्द गॉर्डन मूरलाच या नियमाच्या भविष्याबद्दल खात्री देता येत नव्हती तेव्हा शास्त्रज्ञांनी त्रिमिती ट्रान्झिस्टर संरचनेचा (ज्याला तांत्रिक परिभाषेत 'थ्रीडी फिनफेट' ट्रान्झिस्टर असं संबोधतात) शोध लावून पुढील किमान दोनतीन दशकं हा नियम लागू राहील याची हमी दिली. सत्तरच्या दशकात २३०० ट्रान्झिस्टर्सने बनलेल्या 'इंटेल ४००४' या पहिल्या मायक्रोप्रोसेसर लॉजिक चिपपासून आपण तब्बल १०० कोटी ते १००० कोटी ट्रान्झिस्टर्सने बनलेल्या चिपपर्यंतचा प्रवास गेल्या केवळ ५० वर्षांत केलेला आहे. त्यामुळे यापुढेही कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), फाइव्ह-जी, क्लाऊड तंत्रज्ञान यांसारख्या प्रचंड गणनक्षमता लागणाऱ्या उपयोजनांसाठी सेमीकंडक्टर तंत्रज्ञान त्याच वेगानं प्रगती करत राहील अशी आशा बाळगता येईल.

(२) जरी विज्ञानातील शोधांमुळे मूरचा नियम अजून काही दशकं कार्यरत राहिला तरी त्यास अनुसरून घाऊक प्रमाणात चिपनिर्मिती करणं अत्यंत खर्चीक असू शकतं. आजच अद्यायावत लॉजिक चिपची निर्मिती करण्यासाठी लागणाऱ्या एका 'ईयूव्ही' फोटोलिथोग्राफी उपकरणाची किंमत १० कोटी डॉलर (८५० कोटी रुपये) इतकी प्रचंड आहे. अशा परिस्थितीत चिप मागणी कितीही वाढली तरी 'अधिकाधिक ट्रान्झिस्टर्समुळे वाढती गणनक्षमता व त्याच वेळी घटत जाणारी चिपची किंमत' हे समीकरण किती कालावधीपर्यंत सत्य ठरेल याबद्दल साशंकता आहे. याच कारणामुळे आपल्या गरजेनुसार केवळ चिप संरचना करणाऱ्या 'फॅबलेस' कंपन्यांचं जगभरात विकेंद्रीकरण झालं असलं तरी त्यात सुरुवातीच्या काळात लागणाऱ्या प्रचंड आर्थिक गुंतवणुकीमुळे व परताव्यासाठी लागणाऱ्या दीर्घ कालावधीमुळे 'सिलिकॉन फाऊंड्री' व्यवसाय मात्र मूठभरांच्या हातातच राहण्याचा धोका आहे. आजघडीला अद्यायावत लॉजिक चिपनिर्मिती (७ नॅनोमीटरपेक्षा कमी) करण्याची क्षमता केवळ टीएसएमसी (तैवान), सॅमसंग (दक्षिण कोरिया) व काही प्रमाणात इंटेलकडे (अमेरिका) आहे. येत्या दशकभरात चीनमधील एखादी फाऊंड्री या यादीत समाविष्ट होऊ शकेल. पण आज कार्यरत असलेल्या इतर फाऊंड्रीज या स्पर्धेतून अगोदरच बाहेर पडल्या आहेत. त्यामुळे उच्च कोटीचं चिप डिझाइन करणाऱ्या फॅबलेस कंपन्यांना वरील दोन-तीन चिपनिर्मिती कंपन्यांवर अवलंबून राहण्याखेरीज पर्याय नाही.

(३) आजवर संगणक, सर्व्हर, डेटा सेंटर, मोबाइल अशा अनेक उपकरणांचा गाभा असलेल्या आणि इंटेल किंवा एएमडीसारख्या कंपन्यांकडून निर्मिल्या जाणाऱ्या 'जनरल पर्पज' सीपीयू चिपचं काय होणार हादेखील या क्षेत्रासमोरचा महत्त्वाचा प्रश्न आहे. 'एनव्हीडीआ'नं गेमिंग तसंच एआयच्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेली 'ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट (जीपीयू)' चिप किंवा गूगलनं तिचं क्लाऊड डेटा सेंटर कार्यक्षमतेने चालवण्यासाठी डिझाइन केलेली 'टेन्सर प्रोसेसिंग युनिट (टीपीयू)' चिप - फॅबलेस कंपन्या आत्ताच चिपच्या उपयोजनानुसार तिची संरचना करू लागल्या आहेत. येत्या काळात 'जनरल पर्पज' सीपीयू चिप अशा 'स्पेशल पर्पज' चिप्सशी कशा जुळवून घेतात ते पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

(४) भूराजकीय परिप्रेक्ष्यात धोरणात्मक स्तरावर चिपचं महत्त्व उत्तरोत्तर वाढतच जाणार, हे सांगायला कोणा भविष्यवेत्त्याची गरज नाही. ज्या देशाचं सेमीकंडक्टर तंत्रज्ञान व चिपपुरवठा साखळीवर नियंत्रण आहे तो देश त्याच्या लष्करी सामर्थ्याच्या प्रभावामुळे दुसऱ्या कोणत्याही देशाचा युद्धात सहज पाडाव करू शकेल याची प्रचीती अमेरिका व तत्कालीन सोव्हिएत रशियामधल्या शीतयुद्धापासूनच जगाला आली आहे. आजही सेमीकंडक्टर तंत्रज्ञानात सर्वस्वी परावलंबी असलेल्या रशियाची युक्रेन विरोधातील युद्ध जिंकताना जी दमछाक होत आहे ती या विधानाचीच सत्यता दर्शवत आहे. याच दशकात महासत्ता बनण्याची स्वप्नं पाहत असलेला चीन यामुळेच साम-दाम-दंड-भेद नीतीचा वापर करून चिपपुरवठा साखळीवर स्वत:चं नियंत्रण आणून तिला जागतिक स्तरावर पुनर्स्थापित करण्यासाठी जंग जंग पछाडत आहे.

सेमीकंडक्टर तंत्रज्ञानाचा धोरणात्मक स्तरावर आपल्या फायद्यासाठी कसा वापर करून घेता येऊ शकतो याचा वस्तुपाठ अमेरिकेनं घालून दिला आहे. चीनच्या हाय-टेक क्षेत्रातील घोडदौडीला आणि त्या अनुषंगाने वाढणाऱ्या लष्करी सामर्थ्याला आळा घालण्यासाठी, अमेरिकेने चिपपुरवठा साखळीतील 'चोक पॉइंट्स'वर असलेल्या आपल्या नियंत्रणाचा प्रभावी करून चीनची केलेली तंत्रज्ञान नाकाबंदी साऱ्या जगानं गेल्या तीन-चार वर्षांत अनुभवली आहे. या धोरणाचा वापर करून काही कालावधीसाठी तरी प्रतिस्पर्धी देशाला नामोहरम करता येऊ शकत असलं तरीही याच कालखंडामध्ये सेमीकंडक्टर तंत्रज्ञानात चीन जी प्रगती साधतो आहे, ते पाहता हे धोरण अनंत काळासाठी वापरता येणार नाही हेदेखील तितकंच खरं आहे. सेमीकंडक्टर तंत्रज्ञानात घेतलेल्या आघाडीचा कोणत्याही देशाला सामरिकदृष्ट्या होणारा लाभ, एवढ्यापुरतंच या तंत्रज्ञानाचं महत्त्व सीमित नाही. किंबहुना पुढलं जागतिक युद्ध या तंत्रज्ञानावरल्या नियंत्रणाच्या हव्यासामुळे होण्याची आणि चिपनिर्मितीचे 'तैवानीकरण' झालेल्या या क्षेत्रासाठी अशा युद्धाचा आरंभबिंदू दक्षिण चिनी समुद्रात तैवानपाशी असण्याची शक्यता दिवसागणिक बळावते आहे. असो. गेले वर्षभर डिजिटल युगातील मानवी जीवनाचा अविभाज्य घटक असलेल्या 'सेमीकंडक्टर चिप' नामक वामनमूर्तीच्या चरित्राचा आपण विस्तृत परामर्श घेतला. या विषयाचा आवाका बराच मोठा असल्यानं तंत्रज्ञानाच्या बरोबरीनं ऐतिहासिक, आर्थिक, व्यवस्थापकीय, भू-राजकीय अशा या विषयासंदर्भातील विविध पैलूंचा सखोल आढावा घेण्याचं लेखमालेच्या सुरुवातीपासूनच ठरवलं होतं. पण त्याचबरोबर लेख कंटाळवाणे होऊ नयेत म्हणून प्रत्येक सदराला संवादात्मक स्वरूप देण्याचा व त्यात विविध बाजूंचा निष्पक्षपणे ऊहापोह करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला. प्रत्येक लेखानंतर आलेल्या वाचकांच्या उदंड प्रतिसादामुळे मी या विषयाला काही प्रमाणात तरी न्याय देण्यात यशस्वी झालो असेन असं मनापासून वाटतं. या सदराला मिळालेल्या वाचकांच्या प्रतिसादामुळे मी खरोखरीच भारावून गेलो. केवळ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातूनच नाही तर जिथे जिथे सुजाण मराठी वाचक आहे अशा भारतातील इतर शहरांतून आणि त्याचबरोबर अमेरिका, ऑस्ट्रेलिया व इंग्लंडमधील वाचकांचेसुद्धा पुष्कळ अभिप्राय आले. या नेमाने व अगत्याने भल्याबुऱ्या प्रतिक्रिया नोंदवणाऱ्या व मला व्यक्तिश: समृद्ध करणाऱ्या सर्व वाचकांचा मी ऋणी आहे. अशा अनवट तरीही भारतासारख्या देशासाठी अत्यंत महत्त्वाच्या विषयाचं स्थान यातून ओळखलं जाईल, अशी आशा आहे.हां हां म्हणता वर्ष सरलं. आज या सदरातला हा अखेरचा लेखांक लिहिताना सेमीकंडक्टर चिपसंदर्भातील काही विषयांवर अधिक विस्ताराने लिहायचं वेळेअभावी राहून गेलं याची रुखरुख असली तरीही या वेगळ्या धाटणीच्या विषयावर विशेषकरून मराठीत लिहायला मिळाल्याचं आत्मिक समाधानही आहे. नूतन वर्षातही तुमच्याबरोबरचा हा उत्कट व हवाहवासा वाटणारा संवाद अविरत चालू राहील अशी खात्री बाळगून या लेखमालेच्या शेवटी पुढील उर्दू शेर उद्धृत करावासा वाटतो की, 'सफ़र ख़त्म भी हो जाए तो ग़म न करना, हर अंत से ही नई शुरुआत होती है।' धन्यवाद!

# बोरं आहेत की ॲप्पल? मार्केटमध्ये 'चमेली' खातेय भाव!

## बोरं भरीव, मगजदार असल्याने बाजारात सर्वाधिक मागणी

ॲप्पल बोर हे मूल थायलंड देशातील फळ पीक आहे. उत्तम पश्चिम बंगाल राज्यात पल बोरचे उत्पादन घेण्यात आले. त्यानंतर देशभरात सर्व भागात हे फळ पीक घेतले जात आहे. अधिक वजनदार आणि मगसदार असल्याने बोर चवीला गोड आणि तुरट आहे. मधुमेह असलेल्या नागरिकांसाठी ते आरोग्यदायी आरोग्यदायी मानले जाते. दुष्काळी भागात कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारे पीक म्हणून पल बोर या पिकाकडे पाहिले जाते. एका झाडाला ३० ते ४० किलो बोरं लागतात. एक किलोत आठ ते दहा बोरंस बसतात इतके वजनदार बोर असते. या बोरांची झाडे प्रचंड काटक असतात.



वातावरणात या बोरांच्या झाडांची वाढ होते. ३७ ते ४८ अंश सेल्सिअसमध्ये या झाडांची जोमाने वाढ होते. आग अथवा इतर कुठल्याही कारणाने झाडाचे नुकसान झाले तरी झाड जोमाने उभे राहते. प्पल बोर वालुमिश्रित दगडाच्या खडकाळ मंगला निचरा होणाऱ्या जमिनीतील या झाडाची वाढ होते. हे पीक शेतकऱ्यांना भरघोस उत्पन्न देणारे आहे.

पल बोर हे संकरित आणि निरोगी आहे. त्यामुळे त्याचे आरोग्यदायी गुणधर्म पाहायला मिळतात. बाजारात या बोराला चांगले दर मिळत असल्याने शेतकऱ्यांनी प्पल बोराची लागवड मोठ्या प्रमाणात केली आहे. बोरा मध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि लोहाचे प्रमाण अधिक असते. पोषणाच्या दृष्टीने सफरचंदापेक्षा प्पल बोर श्रेष्ठ मानले जाते. यातील परिपक्व बोराचा औषधासाठी वापर केला जातो. बाजारात प्पल बोर मोठ्या प्रमाणात दाखल झाले आहेत. या बोराला ८० रुपये किलो दर आहे बोर भरीव आणि मगजदार असल्याने बाजारात सर्वाधिक मागणी आहे. बाजारात विक्री करता असलेले बोर ही हिरव्या रंगाचे असून सफरचंदासारखा आकार आहे. यातून ग्राहकांचा बोर खरेदीचा कल वाढला आहे.

**बाजारात चमेलीची जादू**

बाजारात छोट्या आकाराची लालसर ॲप्पल बोरं आहेत. हे सफरचंदासारखी दिसतात; परंतु आकाराने छोटी आहेत. याचा गोडवा चांगला असतो. या मुळे ही बोरे खरेदी केली जातात. आकर्षक रंगाने बाजारात या फळाला चांगली मागणी आहे.

**दर ग्राहकांच्या आवाक्यात**

बाजारात मागणीनुसार विविध फळांची उपलब्धता करून दिली जाते हे दर ग्राहकांच्या आवाकात आल्याने बाजारात खरेदी होत आहे, असे व्यवसायिकांनी सांगितले.

# कोरड्या खोकल्यामुळे होणारा धोका कसा टाळता येईल?

* तुळशीच्या पानांमुळे कोरडा खोकल्यापासून सुटका मिळवता येऊ शकतं. तुळशीचे पान पाण्यात उकळवून घ्या. याला रात्री झोपण्याच्या पूर्वी पिऊन घेणे. किंवा आपण तुळशीच्या पानांचा चहा देखील बनवून पिऊ शकता.

* मध देखील कोरड्या खोकल्याला कमी करण्यासाठी मदत करतं. एक चमचा मधात आलं मिसळून त्याचे सेवन केल्यानं कोरड्या खोकल्या पासून सुटका मिळेल.



कोरड्या पडसं पितंच आहे

* आल्याचा वापर देखील खोकल्यासाठी फायदेशीर आहे. सर्दी असल्यावर आपण आल्याचा चहा तर असाल हा चहा जेवढा चवीला चांगला तेवढेच आल्याचे गुणधर्म देखील फायदेशीर आहे. कोरड्या खोकल्यात आल्याचा सेवनाने आराम मिळतो. आल्याचे बारीक बारीक तुकडे करून एक कप पाण्यात गॅस वर उकळी घ्या. या पाण्याला दिवसभर थोडं-थोडं करून प्या. कोरडा खोकला बरे करण्यासाठी या पेया पेक्षा चांगले काहीच नाही.* ज्येष्ठमध देखील औषधीच आहे. हे कफ कमी करण्याचं काम करतं. ज्येष्ठमधात अँटी इंफ्लेमेटरीचे गुणधर्म असतात. एक कप गरम पाण्यात दोन ज्येष्ठमधाच्या कांड्या टाका. याला १५ ते २० मिनिटे चांगली उकळी घ्या. दिवसातून थोडं थोडं पाणी प्यायल्याने खोकला कमी होऊ लागेल.

**कोरड्या खोकल्याचे धोके काय आहेत :**

कोरड्या खोकल्यात कफ कमी निघतो किंवा अजिबात निघत नसतो. यामुळे छातीत जळजळ होते बऱ्याच दिवस त्रास असल्यामुळे घसा देखील खवखवतो. काही प्रकरणांमध्ये नाकाची एलर्जी, आम्लपित्त, दमा, क्रॉनिक ऑब्सट्रक्टिव पल्मोनरी डिजीज किंवा ट्युबरक्लॉसिस (टीबी) सारखे त्रास उद्भवू शकतात. म्हणून कोरडा खोकला कोणास असलास, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. त्वरितच वैद्यकीय सल्ला घ्यावा.

# पर्यावरणपूरक उत्पादनांची बॉस

खाद्यपदार्थांच्या पॅकेजिंगसाठी प्लास्टिक आणि ल्युमिनियमचा वापर पाहून अस्वस्थ झालेल्या त्या तरुणीने भारतात परतल्यावर एक पर्यावरणपूरक पर्याय शोधून काढला. बायो-डिग्रेडेबल अर्थात जैव विघटन होणाऱ्या उत्पादनांचे उत्पादन आणि मार्केटिंग करण्यासाठी तिने एक कंपनी सुरू केली. इकोवेअर असे त्या कंपनीचे नाव आणि ती तरुणी म्हणजे रिया सिंघल.

रियाचा जन्म मुंबईत झाला होता; परंतु तिची बालपणाची काही वर्षे आई-बाबांसोबत दुबईमध्ये गेली. कालांतराने तिला इंग्लंडमधील बोर्डिंग स्कूलमध्ये पाठवण्यात आले. पुढे तिने २००४ मध्ये इंग्लंडच्या ब्रिस्टल विद्यापीठातून फार्माकोलॉजी ऑनर्स केले. चार वर्षे तिने लंडनमधील विविध केंद्रांमध्ये फायझर फार्मास्युटिकल्सच्या ऑन्कोलॉजी टीममध्ये काम केले. जिथे ती स्तनाचा कर्करोग व कोलन कर्करोग यावर काम करत होती. रिया अवघ्या १९ वर्षांची असताना तिच्या आईला कर्करोग झाल्याचे निदान झाले. तिच्या आईने दोन वेळा कर्करोगाशी दोन हात केले आहेत. कर्करोगाला इतक्या जवळून पाहिल्यानंतर रिया त्या गोष्टी वेगळ्या नजरेने पाहू लागली. ऑन्कोलॉजी क्षेत्रातील औषधविज्ञानाच्या ज्ञान आणि अनुभवाचा तिला फायदा झाला. इकोवेअर सुरू करण्याची बीजे नकळत इथेच रोवली गेली. काही वर्षांनी तिचे लग्न इंग्लंडमधील निशांत सिंघल या तरुणासोबत झाले. लग्नानंतर रिया सासू-सासऱ्यांसमवेत राहण्यासाठी भारतात आली. गरम अन्नाच्या संपर्कात आल्यावर किंवा पुन्हा गरम केल्यावर प्लास्टिक, टिन आणि ल्युमिनियम ब्लीचचे विष, बहुतेक कर्करोगजन्य पदार्थ, या गोष्टींची भारतात फारशी जाणीव नव्हती. हीच रियाला चिंता वाटायची. या उलट इंग्लंडमधील लोकं पर्यावरणाबद्दल आणि प्लास्टिकच्या डब्यातून खाण्याच्या दुष्परिणामांबद्दल इतके जागरूक होते की त्यांनी लाकडाच्या लगद्यापासून बनवलेल्या पर्यावरणास अनुकूल कटलरी वापरण्यास सुरुवात केली. तिला जाणवले की, लोकांना आरोग्य आणि पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून प्लास्टिकच्या वापराबद्दल अधिक जागरूकता हवी आहे. बायो-डिग्रेडेबल मटेरियल वापरून ९० दिवसांत विघटित होणारी इकोवेअरची कल्पना त्यातूनच जन्माला आली. रियाचे सासरे साखर उद्योगातील असल्यामुळे त्यांच्या अनुभवातून तिला विविध कृषी कचऱ्याच्या कच्च्या मालावर प्रयोग करण्याची संधी मिळाली. भारत एक बायोमास राष्ट्र आहे जिथे दरवर्षी कितीतरी टन शेतीमधला कचरा जाळला जातो. ज्यामुळे प्रचंड प्रदूषण होते. रियाने ही समस्या निवारून पर्यावरणाला तसेच शेतकऱ्यांना मदत करण्याचा उपाय शोधण्याचा प्रयत्न केला. ती शेतकऱ्यांकडून कचरा घेऊ लागली. त्यावर प्रक्रिया करून डिस्पोजेबल बॉक्स आणि प्लेट बनवू लागली. फायझरमधील अनुभवाचा फायदा मार्केटिंग आणि विक्रीसाठी झाला.

'इकोवेअर' हे कटलरी आणि कंटेनर्सच्या श्रेणीचे ब्रँड नाव आहे. ज्याने आधीच विस्तारत असलेल्या क्विक सर्व्हिस रेस्टॉरंट (क्यूएसआर) उद्योगाची पसंती मिळवली आहे. या उपक्रमाने अन्नसाखळीतील कर्करोगास पूरक असणारे कार्सिनोजेन कमी करणे, महिला सशक्तीकरण, पर्यावरणपूरक जीवनशैलीला प्रोत्साहन देणे आणि शेतकऱ्यांना मदत करणे यांसारखे अनेक सकारात्मक पाऊल उचलले आहे. पहिल्या वर्षी रियाने फक्त ५०,००० रुपये कमावले मात्र ती खचली नाही. तिने जिद्दीने व्यवसायाचा पाठपुरावा केला. तिच्या चिकाटीला यश आले. २०१० मध्ये राष्ट्रकुल खेळांच्या रूपाने महत्त्वाचा टर्निंग पॉइंट आला. तिला या गेम्समध्ये जेवण देण्यासाठी ईकोवेअरची उत्पादने पुरवण्याची संधी मिळाली. इकोवेअरच्या प्रमुख ग्राहकांमध्ये आयआरसीटीसी (भारतीय रेल्वे), क्यूएसआर चेन हल्दीराम आणि चायोस यांचा समावेश आहे. त्यांचे २८ वितरक आहेत. तसेच वेब पोर्टलद्वारे, मॉडर्न बझार आऊटलेट्सद्वारे आणि दिल्लीतील सदर बाजारच्या घाऊक बाजारातील विक्रेत्यांकडे ऑनलाइन किरकोळ विक्री केली जाते. इकोवेअरचा मोठा सामाजिक प्रभाव आहे कारण तो प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण करून लोकांना उपजीविका प्रदान करतो. त्यापेक्षाही मोठा फायदा म्हणजे आरोग्यावर होणारा परिणाम हा आहे. कारण तो खाण्यासाठी सुरक्षित पर्याय उपलब्ध करून देतो. इकोवेअर उत्पादनांची विल्हेवाट लावल्यावर ९० दिवसांत ते मातीत मिसळून जातात. शिवाय ही उत्पादने मायक्रोवेव्हमध्ये वापरण्यास सुरक्षित आहेत तसेच फ्रीजमध्ये देखील उत्तम स्थितीत राहतात. दिल्लीच्या पॉश मार्केटमधील एका साध्या कार्यालयातून सुरुवात करत स्वतःच्या



मालकीच्या नोएडामधील ५,००० चौरस फूट कारखान्यामध्ये इकोवेअरचा कारभार विस्तारला आहे, तर दुसरा कारखाना उत्तराखंडमध्ये आहे.

कंपनीची वार्षिक उलाढाल २० कोटी इतकी आहे. भविष्यात ती तिप्पट करण्याचा रियाचा मानस आहे. रियाला तत्कालिन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते 'नारी शक्ती पुरस्कार' मिळाला. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने देखील तिला ग्लोबल लीडर म्हणून गौरवले आहे. तसेच 'वुमन ऑफ एक्सलन्स' पुरस्काराने सन्मानित सुद्धा केले आहे. कर्करोगाच्या मुळाशी जात पर्यावरणपूरक उत्पादन तयार करणारी रिया सिंघल लेडी बॉस बिरुदावलीस १०० टक्के पात्र आहे.

# विशेष वृत्त

## मच्छिंद्रनाथ गडावर पौष अमावास्या यात्रा उत्सवास उपस्थित रहा–प्रा. अजित इथापे

**आष्टी –** श्रीक्षेत्र मच्छिंद्रगड (मायंबा) सावरगाव हे नगर बीड जिल्ह्याच्या सीमेवर आष्टी तालुक्यातील ठिकाण. या ठिकाणी चैतन्य मच्छिंद्रनाथाची जगातील एकमेव अशी संजीवन समाधी आहे. येथे पौष अमावास्येला मोठा यात्रा उत्सव चालतो. यावर्षी हा उत्सव दिनांक १७ते २० जानेवारी २०२६ असा चार दिवसात संपन्न होत आहे. या भव्यदिव्य उत्सवास उपस्थित राहावे, असे आवाहन नाथ भक्तातर्फे सामाजिक कार्यकर्ते प्रा. अजित इथापे यांनी केले आहे. देशभरातील लाखो नाथभक्तांचे व अठरापगड जाती धर्माचे श्रद्धास्थान असे मच्छिंद्रनाथ देवस्थान आहे. या गडावर अमावास्येच्या आदल्या दिवशी म्हणजे शनिवारी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत सावरगाव येथे कोठी मिरवणूक काढून शिधा गोळा होईल. दुपारी ३ नंतर कोठी मिरवणूक गडावर येईल. रविवारी गोळा केलेला शिधाचे देव तलाव येथे रोट नैवेद्य तयार करून मिरवणुकीने नाथ संजीवन समाधीस नैवद्य अर्पण होईल. रात्री नाथांच्या घोड्यासमवेत छबीना मिरवणूक होते. सोमवारी दुपारी कुस्त्यांचा जंगी हंगामा होतो व रात्री सांस्कृतिक कार्यक्रम होईल, मंगळवारी धर्मनाथ बिजोत्सव यामध्ये अन्नदान, वस्त्रदान होऊन यात्रा उत्सवाची सांगता होईल. दरम्यान येथे मंदिराचे जीर्णोधराचे काम प्रगतीपथावर आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने येथे दीर्घकाळ टिकणारे पक्षांची लागवड केलेली आहे. आयुर्वेदिक वनस्पती, गावरान गाईची गोशाळा, प्रेक्षणीय पर्यटन स्थळ होत आहे. या गडाचे विश्वस्त तथा आमदार सुरेश धस, अध्यक्ष दादासाहेब चितळे, सचिव बाबासाहेब म्हस्के व सर्व विश्वस्त देवस्थान ट्रस्ट मंडळी, ग्रामस्थ, भाविक भक्त स्वतःला झोकून देऊन नाथ सेवेला हजर असतात. या भव्य दिव्य यात्रा उत्सवास भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन नाथभक्तातर्फे प्रा. अजित इथापे यांनी केले.

## तुळजाभवानी अर्बनने मृत खातेदाराच्या वारसाला दिलासा

### १ लाख ३५ हजारांचे कर्ज विम्यातून फेड



**माजलगाव :** तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी, माजलगाव शाखेचे सोनेतारण कर्ज खातेदार आडे एकनाथ मानसिंग यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले होते. त्यांच्या निधनानंतर संस्थेने त्यांच्या गोल्ड लोन कर्जाचा विमा दावा मंजूर करून तब्बल १ लाख ३५ हजार रुपयांची रक्कम कर्ज खात्यात जमा केली. ही रक्कम जमा झाल्यानंतर संबंधित सोनेतारण कर्ज खाते पूर्णपणे बंद करण्यात आले. तसेच गहाण ठेवलेले दागिने त्यांच्या वारसदार आडे निलाबाई यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले. यावेळी तुळजाभवानी अर्बनचे बीड विभागाचे रिजनल ऑफिसर अमोल बिडवे साहेब, गोल्ड लोन अधिकारी लक्ष्मण पवार, प्रकाश शेजुळ साहेब तसेच डाके उपस्थित होते. तुळजाभवानी अर्बनने दाखवलेल्या या सामाजिक बांधिलकीमुळे संबंधित कुटुंबाला मोठा दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

## गेवराईत मावा बनविणाऱ्यांवर कारवाई

### ११.९१ लाखांचा मुद्देमाल जप्त; दोघांविरुद्ध गुन्हा

**गेवराई :** जिल्ह्यात गुटख्याची विक्री व तस्करी खुलेआम सुरू असतानाच गेवराई शहरात मावा तयार करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी ठोस कारवाई केली आहे. या कारवाईत ११ लाख ९१ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शहरातील शानदार पान सेंटर येथे पोलिसांनी अचानक छापा टाकून तपासणी केली. तपासणीदरम्यान मावा व गुटखा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य आढळून आले. याप्रकरणी समीर मेहबूब शेख (वय ३९) व अमजद जाफर शेख (वय ४१) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी आरोपींकडून सुगंधित तंबाखू, सुपारी, चुना, मावा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे दोन मिक्सर तसेच इतर साहित्य जप्त केले. यासोबतच एक कार व एक दुचाकीही पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या एकूण मुद्देमालाची किंमत ११ लाख ९१ हजार ८०० रुपये इतकी आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपअधीक्षक अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ तसेच राम खोत, हंबर्डे, जितेंद्र ओव्हाळ यांच्या पथकाने केली. पुढील तपास गेवराई पोलीस करत आहेत.

## भारतीय स्टेट बँकेकडून विद्यार्थीनींना सायकल वाटप



**जाटनांदूर :** भारतीय स्टेट बैंक क्षेत्रीय व्यवसाय कार्यालय बीड, भारतीय स्टेट बँक शाखा अमळनेर अंतर्गत पीएम जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जरेवाडी केंद्र पिंपळवंडी तालुका पाटोदा जिल्हा बीड या शाळेत १५ जानेवारी २०२६ रोजी शाळेतील ४२ मुलींना मोफत सायकलचे वाटप करण्यात आले. जरेवाडी मॉडेल स्कूलमध्ये अनेक गावावरून मुले शाळेत येतात. सरदवाडी, धोपटवाडी, रानमळा, जरेवस्ती येथून मुली पायी शाळेत येतात. ही अडचण लक्षात घेता क्षेत्रीय व्यवसाय कार्यालय बीडच्यावतीने शाळेत चालत येणाऱ्या इयत्ता सहावी ते आठवी मधील एकूण ४२ विद्यार्थिनींना मोफत सायकलचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी रीजनल मॅनेजर अमित धुळे,चीफ मॅनेजर सुहास माने, एच. आर. मॅनेजर प्रसाद दंडवते, जयेश भोसले रीजनल सेक्रेटरी, अनंता वाल्लेकर, एसबीआय अमळनेर शाखेचे व्यवस्थापक अमित इंगोले, मॅनेजर आरबीओ बीड, गोविंद खाडे, भारतीय स्टेट बँक अधिकाऱ्यांसह शाळेचे मुख्याध्यापक आजिनाथ सुळे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, शाळेतील सर्व शिक्षक बांधव, ग्रामपंचायत सदस्य तसेच जरेवाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

# दलित महासंघाचे बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन

## अनुष्का पाटोळे मृत्यु प्रकरणाची सखोल चौकशी करुन आरोपींना कठोर शिक्षा करा



**बीड (प्रतिनिधी) :** लातूर जिल्ह्यातील औसा येथील जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सातवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अनुष्का पाटोळे या विद्यार्थीनीचा मृत्यू हा संशयास्पद असून तीची आत्महत्या नसून विकृतांनी तीला जीवे मारल्याचा संशय बळावत आहे. या प्रकरणाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेवून आरोपींना कठोर शिक्षा करावी अशी मागणी बीड दलित महासंघाच्यावतीने बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, लातूर जिल्ह्यातील औसा येथील जवाहर नवोदय विद्यालयात घडलेला प्रकार हा माणूसकीला काळीमा फासणारा आहे. अनुष्का पाटोळे या विद्यार्थीनीची आत्महत्या नसून तो एक खून आहे. लातूरच्या जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणात लक्ष घालून जे आरोपी आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. तसेच नवोदय विद्यालय प्रशासन, प्राचार्य, शिक्षक, वसतीगृह कर्मचारी यांची चौकशी करुन या प्रकरणी जे कोणी दोषी आहेत त्यांना सहआरोपी करुन सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.

तसेच राज्याचे मुख्यमंत्री यांनी देखील या प्रकरणी लक्ष घालून या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करावी अशी मागणी देखील दलित महासंघाच्यावतीने करण्यात आली आहे. निवेदनाची दखल न घेतल्यास महाराष्ट्रात दलित महासंघाच्यावतीने तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही दलित महासंघाचे राज्य उपाध्यक्ष लालासाहेब दुनघव, बीड जिल्हा शहर अध्यक्ष मसु पवार, जिल्हा उपाध्यक्ष अंकुश रोकडे, महिला जिल्हाध्यक्षा आशाबाई धुताडमल, राम लोंढे, मंथ राऊत, दिनेश जाधव, वीर वाघमारे यांनी दिला असून सर्वांच्या स्वाक्षऱ्या निवेदनावर आहेत.

## दहावी-बारावी परिक्षेत सीसीटीव्ही बसविण्यासाठी आर्थिक तरतुद करावी

### मराठवाडा शिक्षक संघाची शालेय शिक्षण मंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी!



**बीड (प्रतिनिधी):-** शालांत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही बसविण्यासाठी आर्थिक तरतुद करावी किंवा एमपीएस्सी, युपीएससी प्रमाणे सरकार अथवा बोर्डाने ती व्यवस्था करावी. या परीक्षेत केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांच्या स्थलांतराचा अव्यवहार्य निर्णय रद्द करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे शालेय शिक्षणमंत्री मा. ना. दादा भुसे यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हा सचिव गणेश आजबे यांनी याबाबत पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत प्रत्येक दालनात सीसीटीव्ही बसविण्याचा आग्रह धरला आहे. परीक्षा संपन्न होताच सीसीटीव्ही फुटेज पेनड्राईव्ह मधे सादर करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी आर्थिक तरतुद मात्र करण्यात आलेली नाही. बेतनेतर अनुदान देण्यात सरकारने आखडता घेतलेला हात आणि कमी केलेले वेतनेतर अनुदान यामुळे कोणत्याही संस्था ताबडतोबीने एवढा मोठा खर्च करू शकत नाहीत. त्यामुळे सीसीटीव्ही बसविण्यासाठी सरकारने आर्थिक तरतुद करावी किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोगाप्रमाणे ती व्यवस्था सरकारनेच करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. केंद्र संचालक आणि पर्यवेक्षक स्थलांतराचा निर्णय देखील असाच अव्यवहार्य आहे. ज्या त्या शाळेचे शिक्षक तिथेच पर्यवेक्षक असल्याने सकाळ आणि दुपारच्या सत्रात शाळा भरवल्या जातात व अध्ययन व अध्यापन प्रक्रिया सुरू राहते. केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांचे स्थलांतर केल्याने परीक्षा कर्तव्यावरील शिक्षक शाळेला जावू शकत नाहीत परिणामी अध्ययन अध्यापन प्रक्रिया बाधित होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. तद्वतच हा निर्णय शिक्षकांवर अविश्वास दाखवणारा देखील आहे. सरकारचा शिक्षकांवर विश्वासच नसेल तर सरकारने परीक्षा घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी अशी मागणीशालेय शिक्षणमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## काकडहिरा येथे रा.से.यो.चे विशेष शिबीर

**बीड :** शहरातील सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्यो राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे तालुक्यातील काकडहिरा येथे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन दि. १५ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाले. याप्रसंगी नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वंभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, सरपंच अमोल बागलाने, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातून व्यक्तीमत्व विकास होतो. समाजसेवेची आवड निर्माण होते. सांघीक जिवन जगण्याचा मुलमंत्र प्राप्त होतो. विद्यार्थ्यांनी ग्रामिण भागाशी संपर्क व संवाद या शिबीरादरम्यान करणे आवश्यक आहे. शिबीराच्या माध्यमातून जिवण उपयोगी संस्कार होत असतात म्हणून विद्यार्थ्यांनी तनमनाने या शिबीरामध्ये सहभाग नोंदवावा.

## अल्पवयीन पिडितेला पळविणाऱ्या आरोपीला बुलढाण्यात पकडले

### अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कारवाई



**बीड (प्रतिनिधी):-** येथील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने त्यांच्याकडे तपास वर्ग होताच अवघ्या २४ तासांत अल्पवयीन पीडित मुलीचा शोध घेऊन आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर दोघांनाही बीडला आणण्यात आले.

पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे २०२५ मध्ये दाखल असलेला गुन्हा १५ जानेवारी रोजी दुपारी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग करण्यात आला होता. या पथकाने गुन्ह्यासंबंधी अवलोकन करून फिर्यादी व साक्षीदारांची भेट घेऊन सखोल चौकशी केली. त्यानंतर तांत्रिक माहितीच्या आधारे तपास करताना पीडित मुलगी व आरोपी यांचे वास्तव शोधले. नंतर पोलीस अधीक्षकांच्या आदेशाने रात्री ९ वाजता ए.एच.टी.यु.चे पथक बुलढाणा जिल्ह्याकडे रवाना झाले. शुक्रवारी (दि.१६) पहाटे ३ वाजता मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार पथकाने सोनाळा (ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा) येथे छापा मारुन पीडित मुलगी व आरोपी यांना त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणाहून ताब्यात घेतले. पुढील कारवाईसाठी सोनाळा पोलीस ठाण्यात नोंद करून पथकाने त्यांना बीडकडे आणले. सकाळी ९ वाजता तपास पथक बीड येथे दाखल झाले. पीडित मुलीला विश्वासात घेऊन समुपदेशन करण्यात आले तसेच तिची आई-वडिलांशी भेट घडवून आणण्यात आली. त्यानंतर पीडित मुलगी व आरोपी यांना पुढील तपासकामी पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे हजर करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कौवत, अपर अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक पल्लवी जाधव, हवालदार उषा चौरे, हेमा बाघमारे, पो.शि. योगेश निर्धार, गजानन चौधरी तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या सर्व कर्मचाऱ्यांनी केली.

## भीम गीतांचा कार्यक्रम संपन्न

**बीड :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या नामविस्तार दिनानिमित्त येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर धांडे होते. प्रमुख उपस्थिती मध्ये उपप्राचार्य डॉ. शिवाजी मोरे तसेच सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. सुनील त्रिभुवन यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुरुवात ग्रंथ विभागातील लिपिक श्री संभाजी गायकवाड यांच्या सुमधुर भीम गीताच्या गायनाने झाली. या कार्यक्रमा प्रसंगी इतिहास विभागाचे प्रा. डॉ. बाबासाहेब जावळे यांनी विद्यापीठाच्या नामांतर लढ्याचा सविस्तर आढावा घेतला.

## नोंदणी प्रमाणपत्रासाठी शिफारस केलेल्या बालगृहांची तपासणी करा

**बीड (प्रतिनिधी):** बाल न्याय अधिनियम २०१५ ची बीड जिल्ह्यात सर्रास पायमल्ली होत असल्याचा गंभीर आरोप करत तत्कालीन महिला व बालविकास अधिकारी सुधीर ढाकणे आणि परिविक्षा अधिकारी मंगेश जाधव यांना तातडीने बडतर्फ करण्याची मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास मंचचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी शुक्रवारी केली.

डॉ. ओव्हाळ यांनी सांगितले की, न्यायालय व जिल्हाधिकारी यांच्या मार्फत बालगृहांच्या नियमित तपासण्या होणे अपेक्षित असते. मात्र, गेल्या दोन वर्षांत या तपासण्या झाल्या नसल्याचा फायदा घेत महिला व बालविकास विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी मोठा घोटाळा केला आहे. ११ जुलै २०२३ च्या शासन निर्णयानुसार, बाल न्याय अधिनियम २०१५ अंतर्गत मुलांची काळजी व संरक्षण घेणाऱ्या २२ संस्थांची प्रत्यक्ष तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश होते. त्यानंतरच त्या संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र देणे अपेक्षित होते. मात्र, या तपासणीत तत्कालीन अधिकारी सुधीर ढाकणे व मंगेश जाधव यांनी बोगसगिरी केल्याचा आरोप डॉ. ओव्हाळ यांनी केला. काही संस्थांकडे पूर्ण इमारत नाही, मूलभूत भौतिक सुविधा नाहीत, तरीही बनावट नकाशे व कागदपत्रांच्या आधारे नोंदणी प्रमाणपत्रासाठी शिफारस करण्यात आली. इमारत अपूर्ण आणि सुविधा नसताना शिफारस का करण्यात आली? असा थेट सवालही त्यांनी उपस्थित केला.

## जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यात यावे

### सीईओ जतीन रहमान यांचे प्रतिपादन



**बीड (प्रतिनिधी):** प्रत्येक विशेष गरजा असणाऱ्या बालकांना गरजेनुसार आवश्यक साहित्य, साधने व इतर उपयोगी साधन, सोयी, उपलब्ध करुन त्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण समावेशीत शिक्षणाचा आदीकर प्राप्त करून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्यावतीने १०० टक्के प्रयत्न करण्यात येतील असे प्रतिपदान बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहयमान यांनी केले आहे.

समग्र शिक्षा समावेशीत शिक्षण उपक्रमांतर्गत विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग बालकांसाठी गरजेनुसार आवश्यक शैक्षणिक साह्यभूत साहित्य साधने उपकरणे उपलब्ध करुन देण्यासाठी बीड तालुक्याच्यावतीने मोजमाप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर, गटशिक्षणाधिकारी समंदर खान, जिल्हा समन्वयक वसीम खान, अलीमोकोचे डॉ. हितेशकुमार मांझा आदींची उपस्थिती होती. प्रत्येक विद्यार्थ्यांला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे अत्यंत महत्वपूर्ण काम सर्व घटकांनी करावे असे प्रतिपादन शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांनी या प्रसंगी केले. तर गटशिक्षणाधिकारी समंदर खान यांनी प्रत्येक गरजेनुसार विद्यार्थ्यांना अनुकलनिय वातावरणात शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणीक उपक्रम, शालेय रॅम्प, समाजकल्याण शिष्यवृत्ती साठी अर्ज करण्याचे आवाहन त्यांनी या वेळी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समग्र शिक्षा सर्व साधनव्यक्ती, केंद्रस्थानी विशेष शिक्षक, जिल्हा कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते.

# बीड ते नाळवंडी रस्त्याच्या निकृष्ट कामावरून भाजप युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर आक्रमक



## काम दर्जेदार होणार नसेल तर बंद पाडण्याचा इशारा

बीड (सरकार)शहराजवळील नाळवंडी नाका ते नाळवंडी रस्त्याचा प्रश्न गेल्या २० वर्षांपासून प्रलंबित आहे. या रस्त्यासाठी ग्रामस्थांनी अनेक आंदोलने केली. त्यानंतर आता जिल्हा नियोजन समितीतून निधी मंजूर झाला. मात्र सुरू असलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या तक्रारी होत्या. या परिसरात मोठ्या प्रमाणावर खडी क्रेशरची जड वाहतूक सुरू असल्यामुळे सध्या होत असलेले काम फार काळ टिकणार नाही, अशी तक्रार ग्रामस्थांनी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडे केली. त्यानंतर त्यांनी शुक्रवारी (दि.१६) रस्त्याची पाहणी केली. काम दर्जेदार होणार नसेल तर बंद पाडण्याचा इशारा संबंधित अधिकाऱ्यांना दिला आहे.

यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी इंजि.चोपडे व पोकळे यांना कामाच्या दर्जाबाबत सूचना केल्या.शासनाच्या निकषांनुसार व गुणवत्तापूर्ण पद्धतीने काम न झाल्यास सदर काम तात्काळ बंद पाडण्यात येईल,असा इशाराही देण्यात आला. यावेळी उध्दवराव मेहेत्रे, भाऊसाहेब सुरवसे, लक्ष्मीआई तांडाचे सरपंच स्वरूप राठोड (नाळवंडी), गणेश राऊत, जुजगव्हानचे सरपंच रवी गंगावणे, संजय बापू काळे, आत्माराम सोनवणे, अशोक सोनवणे, नामदेव म्हेत्रे, रोहित राऊत, राघोजी राऊत, राजू पटेल, बाळू आमटे, घोडके, अभिमान गुंदेकर, विकास यादव, प्रशांत जाधव, मधुकर राऊत, दत्तप्रसाद सानप, बाबासाहेब काळे, युनूस शेख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी पुढील टप्प्यात हा रस्ता सिमेंट काँक्रीटीकरणाचा करून द्यावा, तसेच या कामासाठी पाठपुरावा करावा, अशीही मागणी केली.

## सावरकर महाविद्यालयाच्या रासयो शिबिराचा समारोप

बीड (सरकार): राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरा मधून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित होतात. श्रमसंस्कार आणि सहजीवनाचा अनुभव येतो असे प्रतिपादन संपादक गंमत भंडारी यांनी केले.

आदर्शगाव वंजारवाडी येथे दि.१३ जानेवारी २०२६ रोजी स्वा.सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासी शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर सावरकर संकुलाचे कार्यवाह डॉ.अविनाश देशपांडे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य उमेश जगताप, वंजारवाडीचे सरपंच वैजनाथ तांदळे,आयएमएचे अध्यक्ष डॉ. अनंत मुळे,सर्जेराव तांदळे, डॉ अमोल गीते, डॉ. सुनीता बारकुल, डॉ. तोष्णीवाल, डॉ.संतोष शिंदे यांची उपस्थिती होती.याप्रसंगी पुढे बोलताना संपादक गंमत भंडारी म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातील स्वयंसेवकांना ग्रामीण जीवन काय असते हे अनुभवायला मिळते, नेतृत्व गुण विकसित होतात त्यामुळे व्यक्तिमत्व घडते.



**मुंबई : राज्यातील महानापालिका निवडणुकांमध्ये महायुतीला मिळालेल्या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मुंबई येथील वर्षा निवासस्थानी सत्कार करताना रिपाइं अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, माजी मंत्री अविनाश महातेकर, गौतम सोनवणे, एम.एस.नंदा आदी.**

## जनतेने विकासाला कौल दिला-ना.पंकजाताई मुंडे

मुंबई (सरकार) राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा स्टार प्रचारक ना. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाचा करिश्मा महापालिका निवडणुकीतही दिसून आला. ज्या ज्या ठिकाणी त्यांनी सभा घेतल्या होत्या त्याठिकाणी भाजप अव्वल ठरला आहे.



राज्यातील महापालिका निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाल्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून सर्वत्र जल्लोष साजरा होत आहे. प्रदेश कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, ना. पंकजाताई मुंडे व अन्य नेत्याच्या उपस्थितीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. ना.पंकजाताई मुंडे हया नांदेडच्या प्रभारी होत्या, याठिकाणी त्यांनी वेगवेगळ्या प्रभागात सभा घेतल्या होत्या, तिथे भाजपने बहुमतासह घवघवीत यश संपादन केले. याशिवाय त्यांनी जिथे जिथे सभा घेतल्या त्या पुणे, पिंपरी चिंचवड, अहिल्यानगर, इचलकरंजी, पनवेल, कल्याण, नाशिक आदी ठिकाणी भाजपने ऐतिहासिक यश संपादन करत महा पालिकेवर झेंडा फडकविला. या यशाबद्दल ना. पंकजाताईंचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

या निवडणुकीत भाजपने जोरदार यश मिळवले आहे,मला खूप आनंद होत आहे. आम्हाला ऐतिहासिक विजय मिळेल हा विश्वास होताच.जनतेने विकासाला कौल दिला आहे,विजयाचं श्रेय देवाभाऊंना दिलं पाहिजे अशा शब्दांत ना.पंकजाताईंनी निवडणूक निकालानंतर प्रतिक्रिया दिली.

## महानगरपालिका निवडणुकीतील भाजपच्या ऐतिहासिक विजयाबद्दल बीडमध्ये जल्लोष

बीड (सरकार) भाजपने मुंबई, पुणे, पिंपरी -चिंचवडसह महाराष्ट्रातील अनेक महानगरपालिकांवर झेंडा फडकावत मोठे



व ऐतिहासिक यश संपादन केले आहे. या दणदणीत विजयाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील भाजपच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात जल्लोषात आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, एकमेकांना मिठाई भरवून आनंद व्यक्त केला. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नावाच्या जोरदार घोषणा देत विजयाचा उत्साह साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, हा विजय म्हणजे भाजपच्या विकासाभिमुख नेतृत्वावर तसेच लोककल्याणकारी धोरणांवर जनतेने टाकलेली ठाम विश्वासाची मोहर आहे. याच कार्यक्रमात अखिल भारतीय विमुक्त घुमंतू जनजाती महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ.लक्ष्मण जाधव आणि भाजपचे नवनिर्वाचित स्वीकृत सदस्य गोविंद शिराळे यांचेही अभिनंदन केले. याप्रसंगी भाजपा बीड नगरपरिषद गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, रविंद्र कदम, अजय सवाई, विक्रांत हजारी, सुंदर चव्हाण, गणेश लांडे, संग्राम बांगर, शांतीनाथ डोरले, डॉ.अभय वनवे, दत्ता गायकवाड, राजू शहाणे, महादेव नागरगोजे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## "गोरक्षनाथ टेकडी"येथे गुरुप्रेमातून एकवटले असंख्य भाविक

बीड (सरकार): वारकरी संप्रदायाचा पाया रचनेची प्रेरणा संत निवृत्तीनाथ महाराजांना ज्यांनी करून दिली ते गहिनीनाथ महाराज यांचा गहिनीनाथ गड या बीडच्या भूमीत आहे नाथ नातं संप्रदायाचा पाया ज्यांनी घातला ते मच्छिंद्रनाथ यांची संजीवन समाधी , जालिंदर नाथांची समाधी याच भूमीत आहे,संतश्रेष्ठ नगद नारायण महाराज, बंकट स्वामी महाराज , संत मन्मथ स्वामी महाराज, सुफी संत शहेनशहावली महाराज,संत वामनभाऊ महाराज ,संत भगवान बाबा ,संत माऊली दादा चाकरवाडीकर ,संत किसन बाबा व शांती ब्रह्म संत नवनाथ बाबा महाराज ''बीड हि संत महात्म्यांची भूमी आहे''असे श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये ह भ प योगीराज महाराज गोसावी यांनी विवेचनात म्हटले.



एखाद बीज स्वतःला जमिनीत गाढून घेत तेव्हा त्याचा वटवृक्ष होतो तस गुरुवर्य किसन बाबा महाराज व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी गोरक्षनाथ टेकडी साठी संपूर्ण आयुष्य समर्पित केलं , आयुष्य वेचलं म्हणून आज हा श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी चा वटवृक्ष झाल्याचा दिसून येतो.मनुष्याचा नेहमी बोलण्यावर ताबा असावा अनेक उपद्रव तुमच्या बोलण्याने होतात त्या पेक्षा न बोललेलं बरं म्हणून माणसाचा बोलण्यावर नियंत्रण असावे शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज हे आदर्श समोर ठेवून माणसाने बाबांप्रमाणे कमी बोलावं कमी बोलण्याने मन शांत राहते

माणसाने मान अपमान याच्या पुढे जावे एखाद्याने मान दिला जास्त हाळूऊन जाऊ नये व एखाद्याने अपमान केला तर दुःख करून जो व्यक्ती मान अपमानाचा समान लेख तोच सुखी होतो असे अभंग विवेचन करताना ह भ प योगीराज महाराज गोसावी यांनी केले.

यावेळी कीर्तन सेवेत किर्तन साथ गायनाचार्य वादन साथ मृदंगाचार्य टाळकरी माळकरी विणेकरी भजनी मंडळी यांच्या समवेत असंख्य भाविक भक्त श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे कीर्तन सेवेस उपस्थित होते.

## ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांची जयंती राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा

बीड (सरकार): सौ.के.एस.के महाविद्यालयात शारिरीक शिक्षण विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांची जयंती साजरी करण्यात



आली. याकार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर म्हणाले की, प्रत्येक बिकट परीस्थितीवर मात करुन वीर खाशाबा जाधव यांनी ऑलिम्पिक पर्यंत मजल मारली. हे त्यांच्या कडून शिकण्या सारखे आहे. तसेच उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करताना सर्व सोयीसूविधा देण्यासाठी महाविद्यालय कटिबध्द आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वंभर देशमाने, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, उपप्राचार्य अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. ए.एस.खान, कमवि डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भागचंद सानप, डॉ. शेख शकील रहिम, डॉ. ज्ञानेश्वर घोडके, डॉ. प्रियंका नवले, प्रा.अमृतसिंग बिसेन तसेच क्रीडा विभागातील सर्व कर्मचारी तसेच खेळाडू मोठया संख्येने उपस्थित होते.

## एसएफआयने जिल्हा परिषदेवर काढला मोर्चा

बीड (सरकार)स्टुडंट्स ऑफ इंडिया (एसएफआय) च्यावतीने बीड जिल्हा परिषदेवर मोर्चा काढण्यात आला. तसेच धरणे आंदोलन करून शाळा भरवण्यात आली. गेवराई तालुक्यातील खांडवी परिसरातील तुकानाईक आणि अंबुनाईक तांडा येथील जिल्हा परिषद शाळेतील तसेच अहिल्याबाई होळकर विद्यालयातील शैक्षणिक समस्यांना घेऊन हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनातील मागण्या २३ जानेवारीपर्यंत सोडविण्यात येतील, असे लेखी आश्वासन जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने दिल्यानंतरच आंदोलनाला तात्पुरती स्थिती देण्यात आली. आंदोलनामुळे परिसरात विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. या आंदोलनात एसएफआयच्या कार्यकर्त्यांसह परिसरातील युवक, पालक तसेच शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

अहिल्याबाई होळकर विद्यालय, खांडवी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तुकानाईक तांडा आणि अंबुनाईक तांडा, खांडवी ता. गेवराई येथील विद्यार्थ्यांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी जिल्हा



परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना अनेक समस्या व अडचणीचा सामना करावा लागत आहे. या समस्या सोडवण्यासाठी शालेय प्रशासनाला वारंवार निवेदन देऊन, त्यांच्याशी चर्चा करुन देखील या समस्यांची दखल घेतली जात नव्हती. मागील अडीच ते तीन वर्षांपासून याबाबत पाठपुरावा केला जात होता. परिणामी एसएफआय बीड जिल्हा कमिटीने जिल्हा परिषद कार्यालयासमोर शाळेतील विद्यार्थ्यांना सोबत घेऊन आंदोलन केले.

छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलातून मोर्चा काढण्यात आला. जिल्हा परिषदेसमोर मोर्चा गेल्यानंतर धरणे आंदोलन सुरू झाले. तसेच विद्यार्थ्यांची शाळा भरवण्यात आली. जोपर्यंत या मूलभूत समस्या मार्गी लागत नाहीत, तोपर्यंत तीव्र धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला गेला. त्याचा परिणाम म्हणून प्रशासनाचे प्रतिनिधी आंदोलनस्थळी त्वरित चर्चेला आले. तसेच शिक्षणाधिकारी (प्रा.) यांच्याशी सविस्तर चर्चा झाली. आंदोलनातील मागण्यांवर २३ जानेवारीपर्यंत तोडगा काढण्यात येईल, असे लेखी आश्वासन शिक्षणाधिकारी यांनी दिल्यानंतर आंदोलनाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

## पापनाशी नदीचे पुनरुज्जीवन शाश्वत शेतीसाठी वरदान ठरेल-मयंक गांधी



परळी (सरकार) पापनाशी नदीचे पुनरुज्जीवन या भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल. नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण होऊन त्यामध्ये ऋठअ केले जाणार असल्यामुळे करोडो लिटर पाणी जमिनीत साठवले जाईल. हेच पाणी नव्याने फळबाग लागवड करून त्यातून शेतकऱ्यांची आर्थिक समृद्धी साधण्यासाठी मैलाचा दगड ठरेल असे प्रतिपादन ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी केले तर मध्य प्रदेश सरकारचे माजी सचिव तथा ज्येष्ठ सनदी अधिकारी सुधी मोहंती यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हटले की, शाश्वत शेतीतून शेतकऱ्यांची प्रगती व्हावी यासाठीची मयंक गांधी यांना प्रचंड तळमळ असून, ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था ही या भागाला लाभलेले वरदान आहे. संस्थेकडून केल्या जाणाऱ्या कामांमध्ये लोकांनी उत्स्फूर्त लोकसहभाग नोंदवावा असे आवाहन त्यांनी केले.

## आष्टी तालुका पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा मनसेकडून सत्कार

आष्टी (सरकार) आष्टी तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष सानप यांची, उपाध्यक्षपदी मनोज पोकळे व शरद रेडेकर यांची तसेच कार्याध्यक्षपदी भीमराव गुरव यांची निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांच्या वतीने नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. हा सत्कार सोहळा उत्साहपूर्ण आणि सकारात्मक वातावरणात पार पडला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले शिवसेना नेते सुभाष राऊत यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, पत्रकारिता ही लोकशाही व्यवस्थेचा चौथा स्तंभ असून, समाजातील शोषित, वंचित व सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य पत्रकार बांधव करीत आहेत. आष्टी तालुक्यातील पत्रकारांनी निर्भीड, निष्पक्ष व सत्याधारित पत्रकारिता करत लोकशाही अधिक बळकट करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



## लिंबागणेश पंचक्रोशीतील धनगर बांधव मुंबईकडे रवाना

बीड (सरकार): धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, या प्रमुख मागणीसाठी धनगर समाजाचे नेते दिपकभाऊ बो-हाडे हे दि. २१ जानेवारीपासून मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसणार आहेत. त्यांच्या या न्याय्य मागणीला पाठिंबा देण्यासाठी मराठा सेवक आज दि. १७ रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील मुख्य प्रवेशद्वारावर धनगर समाजासह अठरापगड जातीतील समाजबांधव मुंबईकडे रवाना होणार असल्याची घोषणा करण्यात आली.

यावेळी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. येळकोट येळकोट जय मल्हार,जय मल्हार बोलो, मुंबई चलो,

दिपकभाऊ आगे बढो, हम तुम्हारे साथ है,आरक्षण आमच्या हक्काचं आहे, नाही कोणाच्या बापाचं अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडण्यात आला.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)